# शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपलिका
# कै. भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना
# जाहिर निविदा क्रमांक ३

शिक्षण मंडळ पुणे महानगरपलिका यांचेकडून खालील तपशीलात नमुद केलेल्या बाबींसाठी दोन लिफाफे (Two Bid System) पध्दतीने सिलबंद निविदा सक्षम संस्था,व्यक्ती, कंपनी यांचेकडून मागविण्यात येत आहेत. निविदा अर्जासोबत निविदा अटी व इतंर सविस्तर माहिती वरील पत्यावर समक्ष मिळेल,पोष्टाने माहिती पाठविली जाणार नाही व पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

| | |
|---|---|
| **१. कोरे निविदा प्रपत्र विक्री –** | निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून बुधवार दिनांक २१/०४/१०पासून ११/०५/१० पर्यंत कार्यालयीन वेळेत फक्त शिक्षण मंडळ कार्यालयात मिळेल. |
| **२. निविदा व बयाणा स्विकृतीची तारीख व वेळ –** | निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून बुधवार दिनांक १२/०५/१० रोजी दुपारी १.००वाजे पर्यंत |
| **३. निविदा उघडण्याची वेळ** | बुधवार दिनांक १२/०५/१०रोजी दुपारी ३.०० वाजता किंवा कार्यालयीन सोयीनुसार निविदा भरणाऱ्यांच्या किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील. |
| **४. निविदा दर** | सर्व करांसह व वाहतुकीसह देणे आवश्यक आहे. |

शिक्षण मंडळ, पुणे मनपाचे करिता शैक्षणिक वर्ष २०१०–११ अखेर खरेदी करावयाच्या बाबी व त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ. क्र. | तपशील | तरतुद रूपये | अंदाज नग | फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| १) | <u>आधुनिक फळे</u><br>सोबतच्या परिशिष्ट 'ब' मध्ये नमूद स्पेसिफिकेशन नुसार | २५,००,०००/– | ३२० | २०००/– |

सुचना –

१. निविदा भरताना बयाणा रक्कम निविदा रकमेच्या शेकडा १ टक्का व निविदा मान्य झाल्यावर शेकडा पाच टक्के अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.निविदा फॉर्म सोबत अटी,स्पेसिफिकेशन,निश्चित केलेली बयाणा रक्कम कार्यालयात भरून मुदतीत निविदा घेवून ती मुदतीत भरून देणे आवश्यक आहे.

२. निविदा प्रसिध्दी प्रक्रिया, माल स्विकारताना घ्यावयाची दक्षता, अनुषंगिक करार इ. सर्व बाबींकरिता महाराष्ट्र शासनाने २ जानेवारी १९९२ रोजी प्रसिध्द केलेला शासन निर्णय व शिक्षण मंडळ कायदा १९४७ व नियम १९४९ चे तरतूदीस अधिन असेल.

३. कोणतीही निविदा स्विकारणे व नाकारणे हा मा शिक्षण मंडळाचा अधिकार आहे व राहील

४. आधुनिक फळे पुरविण्याचे आदेश मिळाल्यापासून एकूण ६० दिवसाचे आत साहित्याचा पुरवठा शाळावार करावा लागेल.

५. सदर निविदा, त्या संबंधीची सर्व माहिती पुणे मनपाच्या वेबसाईट www.punecorporation.org वर पाहण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहे व शिक्षण मंडळाचे नोटीस बोर्डवरही प्रसिध्द केली आहे.

| | |
|---|---|
| **अध्यक्ष** | **शिक्षण प्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.** | **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.** |

# शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका
# स्पेसिफीकेशन सन २०१०—११
# निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक ११/०५/२०१०
# दुपारी १ वाजेपर्यंत

## आधुनिक फळे

## बयाणा रक्कम : २५,०००/—

शिक्षण मंडळ पुणे मनपाच्या प्राथमिक शाळांतील वर्गखोल्यांसाठी शिक्षण मंडळामार्फत आधुनिक फळे पुरविणाऱ्या पुरवठादार/कंपन्यांनी दोन पाकीट पध्दतीने निविदा भरावयाची आहे. नमुने सिलबंद करून व त्यावर लेबल लावणे आवश्यक आहे **आधुनिक फळेंचे** नमुने निविदेसोबत कार्यालयाकडे सादर करण्यात यावेत. नमुन्याशिवाय निविदा स्विकारली जाणार नाही. शासन मान्य प्रयोगशाळेचे तपासणी अहवाल ग्राहय धरले जातील व त्या संबंधीचा कोणताही पत्र व्यवहार गृहीत धरला जाणार नाही

निविदादारांने आधुनिक फळेंचा नमुना तपासणी खर्चापोटी खालीलप्रमाणे रक्कम भरणे आवश्यक आहे

**नमुने तपासणी खर्च : रुपये २०,०००/—**

**SCHEDULE SPECIFICATIONS FOR MAGNETIC GREEN WRITING GRID BOARDS (CHALK / PEN BOARD) :**

1. Writing Board Size – 6 feet (L) X 4 feet (H) X 9 mm thickness (min)
2. Plain particle Board (wood based) with ISI mark.
3. Front of the board should have 0.40mm thick green chalk acrylic resin triple coated M.S.Sheet with 8 H HARDNESS using pop jam rivets.
4. Board back should have sliver finished 32 gauge G I Sheet.
5. Board framed with 1” width aluminum anodized upto 25 micron, with four moulded ABS Sliver plated Chrome Comers.
6. Finished writing board should be cold pressed.
7. The Glue/Rosin used as an adhesive should accompany a relavant documents of non usage of urea formaldehyde in boards.

8. An arrangement for fixing of the board should be provided on the Aluminium frame itself alongwith the installation.
9. Surface of the Board shall be long lasting and crack proof.
10. The board should be free from quality problem like – dent mark, bubble pathes, warpage.

<u>Compulsory Requirements</u> :-

1. Only Particle Board (wood based) manufacturer or their authorized dealers can quote.
2. Tenderers should submit photocopy of the valid ISI Certificate for plain particle Board ( wood based) of the manufacturer of Indian origin.
3. Tenderers must 2 nos. full made up Green Board Samples 24" X 18" mentioned in the description exactly as per specification in the office of the Education Officer, Pune Municipal Corporation, Shivajinagar, Pune. on or before the due date and time for submission of tender.
4. The tenderers received without samples will not be considered. The Samples will not be accepted after the due date and time.

निविदादारांनी नमुना तपासणी खर्च निविदा भरताना कर्यालयात स्वतंत्र चलनाने रोख भरणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचे नमुने तपासणीकरिता पाठविले जाणार नाही व त्याची निविदा विचारात घेतली जाणार नाही.

**आधुनिक फळयांचा दर** सर्व करासह व फिटींगसह व वाहतुकीसह देण्यात यावेत. शाळावार वाटप करावे लागेल.योग्य कारणावरून कोणतीही निविदा नाकारण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळाला राहील.

सदर या फॉर्ममध्ये स्पेसिफिकेशन बाबत काही शंका असल्यास,सांख्यिकी किंवा नकळत टायपिंग चूक झाली असल्यास संबंधित भांडारपालांशी संपर्क साधून माहिती घ्यावी.

**अध्यक्ष**
**शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका**

**शिक्षण प्रमुख**
**शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका**

# शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
# शिवाजी नगर, पुणे ४११००५
# आधुनिक फळे पुरविणेकामी निविदा अटी व शर्ती २०१०—११.

१.संदर्भः—

पुणे दैनिक केसरी व दैनिक सांजवार्ता मध्ये दि.२१/०४/१० व २२/०४/१० रोजी प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्रं. ३/भांडार/**आधुनिक फळे** खरेदीबाबत.

शिक्षण मंडळ,पुणे मनपा मार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांसाठी **आधुनिक फळे** पुरविण्याचे कामी **विहीत नमुन्यातील निवीदा फॉर्म व निविदा अटी खालीलप्रमाणेः—**
मा शिक्षण मंडळ पुणे म.न.पा, पुणे व त्यांनी नियुक्त व अधिकृत केलेल्या खरेदी समितीने शैक्षणिक आर्थिक वर्ष सन २०१०—११ चे करिता खालील **(परिशिष्ठ अ)** मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून, **परिशिष्ठ ब** मध्ये नमूद केलेल्या कार्यालय स्पेसिफिकेशननुसार **आधुनिक फळे** यांचे दर देण्यात यावेत.
निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असुन **अ** पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

१. **अ.पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

१. निविदा रकमेच्या शेकडा १% या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेचा मा.शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (DD) किंवा रोख भरणा कार्यालयात भरावा. २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट १२ अन्वये संबंधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निवीदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस.एस.आय.युनिट असले तरीसुध्दा बयाणा वरील रकमा रोख भराव्या लागतील.

२. निवीदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र.

३. आर्थिक वर्ष २००९—१० मध्ये अद्ययावत व्हॅट भरल्याबाबतचा पुरावा तसेच मार्च, २०१० अखेर व्हॅट क्लिअरन्स सर्टिफिकेट जोडावे आणि संबंधित निविदाराच्या फर्मची गत तीन वर्षाची उलाढाल निविदा रकमेच्या तीनपट असल्यास प्राधान्याने विचार केला जाईल.

४. शासन, शासन अंगिकृत व इतर संस्थांना **आधुनिक फळे** पुरवल्या बाबतची अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र.

५. निवीदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाण पत्राची (Pan No.) छायांकित प्रत, तसेच मागील वर्षाचे इनकम टॅक्स रिटर्न प्रत.

६. निवीदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृतभागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदारांची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेचे नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निवीदादार शासन किंवा शासन अंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे.

७. व्यवसायकर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक

८. निवीदादाराची निवीदा कामाची पुर्तता करण्यासंबंधीची आर्थिक क्षमता असल्या बाबतचे निवीदेच्या एकूण किमतीच्या किमान २५ टक्के रकमेचे.बॅकेचे अद्ययावत प्रमाणपत्र (बॅक सॉलव्हन्सी) आवश्यक आहे.

९. अ पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीचे वेळी ठेकेदारांना समक्ष कामी सादर कराव्या लागतील.

२. पाकीट “ब” मध्ये निविदा धारकाने सर्व करासह दर भरावेत व दोनही पाकीटे सिलबंद करून त्या पाकीटावर निवीदेचे नाव, निवीदा क्रं.नमुद करून तो सिलबंद करून सादर करावा.

३. अ पाकीटमध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास ब पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत मा.शिक्षण मंडळाचा निर्णय अतिंम राहील.

### “ब” पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.

- विहीत नमुन्यातील आधुनिक फळेंचे दर सर्व करांसह देण्यात यावेत.

**४. निवीदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.**

१. निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. आधुनिक फळेंचे दर अंकी व अक्षरी लिहावेत.

२. निविदा स्विकारण्याचा,नाकारण्याचा पुर्ण अगर अशंत: मंजुर करण्याचा सर्वस्वी

अधिकार मा.शिक्षण मंडळास राहिल.

३. निविदाकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार मा.शिक्षण मंडळास आहे.

४. मान्य निवीदा धारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन ७ दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्राकावर करार करणे बंधनकारक आहे.करार करण्यास निविदादाराने लेखी स्वरूपात असमर्थता दर्शविल्यास बयाण रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

५. मान्य निवीदादारास करार करतेवेळी **आधुनिक फळे** पुरवठयाच्या एकूण किंमतीच्या ५% रक्कम सुरक्षा/अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (DD)किंवा रोखीने भरावी लागेल.

६. निविदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष २०१०—११ करिताच करार केल्यापासून बंधन कारक राहतील.

७. निवीदा फॉर्मनूसार पाकीट ‘ब’ मधे **आधुनिक फळेचे** दर भरण्यात आलेले आहेत. आधुनिक फळेचा नमुना निवीदादाराने स्वखर्चाने निविदा सोबत दयावयाचा आहे. सदर नमुना खरेदी करावयाची जबाबदारी किंवा त्या कामी असलेला खर्च देण्याची जबाबदारी मा.शिक्षण मंडळावर नाही. नमुना दिल्याशिवाय निवीदा स्विकारता येणार नाही.

८. बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

९. **आधुनिक फळे** पुरविण्याकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा.शिक्षण मंडळास राहिल.

१०. दिलेल्या मुदतीत स्पेसिफिकेशन प्रमाणे **आधुनिक फळे** न पुरविल्यास निविदादाराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निवीदादारास ब्लॅकलिस्ट करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

११. करारनाम्यानुसार पुरवठा करावयाचे **आधुनिक फळे** कार्यालयाने दिलेल्या

यादीनुसार मनपा शाळांमध्ये स्वखर्चाने जकातीच्या रकमेसह पोहचविण्याची व फिटींग करण्याची जबाबदारी निविदादारांवर आहे. मा शिक्षण मंडळाची पाहणी झाल्यानंतर त्यातील काही नमुने शासनमान्य प्रयोगशाळेकडून तपासणी करून घेतली जाईल

१२. प्रयोगशाळेच्या तपासणी अहवालानुसार निविदादाराने शाळांमघ्ये आधुनिक फळयांचा पुरवठा केलेला नसेल असे निदर्शनास आल्यास निविदाराने १० दिवसांच्या आत स्वखर्चाने ते नेले पाहीजेत ते न नेल्यास त्यास दररोज रू.५०००/— (अक्षरी रूपये पाच हजार फक्त ) प्रमाणे जागा भाडे आकारले जाईल व ३० दिवसांपेक्षा जास्त दिवस झाल्यास त्या मालाची जबाबदारी मा.शिक्षण मंडळावर राहणार नाही .

१३. पुरवठा केलेले सर्व **आधुनिक फळे** मोजून, तपासून घेवून दिलेल्या नमुन्या प्रमाणे असल्याची खात्री मा शिक्षण मंडळास झाल्याशिवाय बिल मिळणार नाही. कोणत्याही स्वरूपात हप्त्याने आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही तसेच देय बिलातून आयकर कलम १९४ सी नुसार टीडीएसच्या रकमेची कपात केली जाईल.

१४. निविदादाराचे उत्पादक युनिटला करारनामा करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार मा शिक्षण मंडळ भेट देईल त्याकामी निविदादाराने सर्व सहकार्य केले पाहिजे.

१५. एकदा भरलेली निविदा रदद् करता येणार नाही एखादयाला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा शिक्षण मंडळाला राहिल तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

१६. मा.शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल. त्यापुर्वी कोणालाही बयाणा रक्कम मागण्याचा अधिकार असणार नाही. बयाण परतावा मागताना रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१७. निविदादाराने **आधुनिक फळे** पुरविण्यास तयार झालेले आहेत त्या संबधी पाहणी व तपासणी करण्याची विनंती मा शिक्षण मंडळास केली पाहिजे व तसे विनंती पत्र देणे आवश्यक आहे.

१८. **आधुनिक फळे** पुरविण्याबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

१९. निविदा एकास/अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार मा शिक्षण मंडळास

आहे.

२०. **आधुनिक फळे** सांगितलेल्या शाळेत पुरविल्यानंतर त्याची मा शिक्षण मंडळाकडून पाहणी करण्यात येईल.पुरविलेले **आधुनिक फळे** विहित नमुन्यात आहेत किंवा नाहीत हे पाहिले जाईल खराब किंवा स्पेसिफिकेशन प्रमाणे नसलेले **आधुनिक फळे** कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.

२१. निविदादाराने पुरविलेल्या **आधुनिक फळे** बाबत मा शिक्षण मंडळास काही शंका आली तर त्याची गुणवत्तेची तपासणी सक्षम प्रयोगशाळेकडून करण्यात येईल.व त्याची खर्चाची सर्वस्वी जबाबदारी निविदादारावरच राहिल.

२२. मंजुर केलेल्या अधिकृत नमुन्याप्रमाणे व ठरवून दिलेल्या मुदतीत पुरवठा झाल्या नंतर पुरवठा केलेल्या **आधुनिक फळे चे** एकत्रित देयक मा.शिक्षण प्रमुख शिक्षण मंडळ पुणे म.न.पा.पुणे यांच्या नावे या कार्यालयात सादर करावे लागेल शाळावार **आधुनिक फळे** चा पुरवठा करताना प्राप्त केलेली चलन्स संबधित शाळेच्या मा. मुख्याध्यापकाच्या नाव, स्वाक्षरी व शिक्यासह देयकासमवेत सादर करावी लागतील व पुणे मनपाकडील जकात विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत बिल देण्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

२३. निविदा दिनांक <u>१२/०५/२०१०</u>रोजी दुपारी ३ वाजता किंवा मा.शिक्षण मंडळाचे सोईनुसार उघडण्यात येतील.वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वत: किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडल्यास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनी वरुन कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

पुणे.

दिनांक

**अध्यक्ष**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**

**शिक्षण प्रमुख,**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.**

## प्रतिज्ञालेख

मी,श्री.————————————————————वय———वर्ष
व्यवसाय—धंदा,राहणार—————————————————————————
निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,वरील निवीदेच्या,फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निवीदा भरलेली आहे व निवीदासोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निवीदेसोबत दाखल करित आहे.
पुणे:—
दिनांक:—

पुरवठा धारकाचे नाव,सही व शिक्का